तरुण भारत संवाद

बुधवार, १७ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'च्या श्रीहरी शिपुगडे, वैष्णवी ढेंगे यांचे यश

**कोल्हापूर :** राष्ट्रीय थल सेना कॅम्पच्या माध्यमातून छात्रांच्या शारीरिक आणि मानसिक सक्षमतेची कसोटी आणि चाळण युनिट , बटालियन ,ग्रुप , डायरेक्टरेट आणि राष्ट्रीय पातळीवर घेतली जाते. ही सर्व शिबिर कोल्हापूर अमरावती आणि दिल्ली येथे होतात. विवेकानंद कॉलेजमधील सार्जंट श्रीहरी शिपूगडेने ऑबस्टॅकल व जेयुओ वैष्णवी ढेंगेने टेन्ट पिचिंग या प्रकारामधून दिल्लीच्या शिबिरापर्यंत यशस्वी वाटचाल केली. राष्ट्रीय छात्र सेनेच्या देशभरातील १३ लाख मुलांमधून २५० छात्रांची निवड केली जाते. यामध्ये कोल्हापूरच्या मुलांनी यशस्वीतेची पताका फडकवली आहे. या निवडीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, एनसीसी विभाग प्रमुख मेजर सुनिता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, कर्नल मानस दीक्षित, कर्नल विक्रम नलावडे, लेफ्टनंट कर्नल धनाजी देसाई पाच आणि सहा महाराष्ट्र बटालियन एनसीसी स्टाफ, पालक यांचे मार्गदर्शन लाभले.



वैष्णवी ढेंगे



श्रीहरी शिपुगडे

तरुण भारत संवाद
बुधवार, १७ सप्टेंबर २०२५

# स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये भित्तीपत्रक प्रदर्शनाचे उद्घाटन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज येथील वनस्पतीशास्त्र विभाग आणि अंतर्रंगी गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय ओझोन दिनी भित्तीपत्रक प्रदर्शन करण्यात आले. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी 'ओझोन संवर्धन : पर्यावरण संरक्षणाची गरज' यावर आधारित भित्तीपत्रके सादर केली. विद्यार्थ्यांनी आकर्षक रेखाचित्रे, प्रभावी घोषवाक्ये आणि माहितीपूर्ण मांडणीद्वारे ओझोनचे महत्त्व, त्यावरील धोके आणि त्याच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजनावर प्रकाश टाकला. उद्घाटन डॉ. परशुराम तेली यांच्या हस्ते करण्यात आले. वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.